झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,पुणे.
(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
चौथा मजला,काकडे बीझ् आयकॉन, ई-स्क्वेअरजवळ,
अशोकनगर, गणेशखिंड रोड, शिवाजी नगर, पुणे-४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (O) : ०२०-२५५७७९९९
ईमेल-: srapune@yahoo.in वेबसाईट: www.srapune.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.झोपुप्रा/प्रशा/१३६८/२०२३
दि.२४ /०७/२०२३.

कार्यालयीन आदेश क्र :-११/२०२३

विषय :- विकसकाकडून पात्र झोपडीधारकांना संक्रमण काळातील भाडे वेळेवर मिळण्याबाबत समन्वय अधिकारी यांची नियुक्ती करणे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि. आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३क मधील तरतूदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याबाबतचा आदेश निर्गमित केल्यानंतर झोपडीधारकांची तात्पुरती निवासी व्यवस्था करण्यासाठी विकसकाकडून प्राधिकरणामार्फत संक्रमण शिबीराची व्यवस्था करून सदनिका नि:शुल्क स्वरूपात देण्यात येते किंवा सन २०१४ च्या नियमावलीतील नियम १७ (सी) मधील तरतुदीनुसार निर्धारित भाडे रक्कम पात्र झोपडीधारकांना देण्यात येते.

संक्रमण कालावधीतील भाडे झोपडीधारकास मिळत नसलेबाबत श्री. विजेंद्रकुमार रॉय यांनी मा. उच्च न्यायालय येथे जनहित याचिका क्र.१०९/२०१९ दाखल केली होती व त्यामध्ये दि. १९/०७/२०२३ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले आहे की, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे वैधानिक प्राधिकरण असून त्यांच्याकडे झोपडपट्टी पुनर्विकासाचे काम योग्यरीत्या पार पाडण्याचे कामकाज सोपविण्यात आले आहे. सदर कामकाजामध्ये पात्र झोपडीधारकांना संबंधित विकसकामार्फत संक्रमण काळातील भाडे वेळेवर देण्यात येते किंवा कसे यावर नियंत्रण ठेवणे या बाबीचाही समावेश आहे.

संबंधित विकसकाकडून पात्र झोपडीधारकांना वेळेवर भाडे न मिळाल्याने त्यांना आर्थिक समस्यास तोंड द्यावे लागते. सबब, पात्र झोपडीधारकांना विकसकाकडून संक्रमण काळातील भाडे वेळेत न मिळाल्याबाबत झोपडीधारकांकडून ज्या तक्रारी प्राधिकरणाकडे प्राप्त होतात त्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्राधिकरण स्तरावर समन्वय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी, असे आदेश मा. उच्च न्यायालयाने दि. १९/०७/२०२३ रोजीच्या सुनावणीअंती दिलेले आहेत. सदर आदेश विचारात घेऊन, **तहसीलदार (ताबा), झो.पु.प्रा. यांची समन्वय अधिकारी** म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

यासंदर्भात दरमहा पहिल्या सोमवारी होणाऱ्या विभागप्रमुखांच्या बैठकीत अशा प्रकरणांचा आढावा घेऊन त्यासंदर्भात विहित पूर्तता करण्याबाबत समन्वय अधिकारी यांचेकडून कार्यवाही करण्यात यावी.

(नीलेश र. गटणे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-/ तात्काळ अंमलबजावणीसाठी.
१) सर्व विभाग प्रमुख, झो.पु.प्रा.,पुणे.
२) श्री. विकास भालेराव, तहसीलदार, झो.पु.प्रा.,पुणे.